महा मेट्रो

PUNE METRO

# शिवाजीनगर ते स्वारगेट भुयारी मार्गांपैकी एका बाजूच्या टनेलचे काम पूर्ण




पुणे , १४.०१.२०२२  : पुणे मेट्रोच्या पीसीएमसी ते स्वारगेट या मार्गिकेमध्ये शिवाजीनगर ते स्वारगेट हा मार्ग भुयारी  आहे.  या मार्गिकेची लांबी ६ किमी असून त्यामध्ये शिवाजीनगर, सिव्हिल कोर्ट, बुधवार पेठ, मंडई, स्वारगेट  हि पाच भूमिगत स्थानके आहेत. कृषी महाविद्यालय ते स्वारगेट या भुयारी मार्गाची लांबी ६ किमी असुन जाण्यासाठी व येण्यासाठी असे  दोन टनेल बांधण्यात येत आहे.  या दोन टनेल पैकी एका बाजूचे टनेल खोदण्याचे काम आज पुर्ण झाले आहे. एकुण १२ किमी टनेल पैकी १०.८ किमी (९० % ) टनेलचे काम पुर्ण झाले आहे. आज दि. १४.०१.२०२२ रोजी स्वारगेट वरून निघालेले पवना नावाचे टनेल बोरींग  मशीन बुधवार पेठ येथील भूमिगत स्थानकात पोहोचले आणि ब्रेक थ्रू  साधला गेला  आहे.  स्वारगेट मधून निघालेले चवथे टनेल बोरिंग मशीन मंडई स्थानकाजवळ असुन लवकरच ते उर्वरीत १.२ किमीचा बोगदा पुर्ण करून बुधवार पेठ स्थानकाजवळ मार्च २०२२ अखेरीस पोहोचेल.

आजमितीस स्वारगेट स्थानकाचे ४५ % , मंडई स्थानकाचे २०%, बुधवार पेठ स्थानकाचे ४०% , सिव्हिल कोर्ट स्थानकाचे ७५ % आणि शिवाजीनगर स्थानकाचे ७० % काम पुर्ण झाले आहे. भुयारी टनेल मध्ये मेट्रोसाठी आवश्यक असणाऱ्या विद्युत वाहक तारा " overhead equipment " (OHE ) ची कामे सुरु झाले आहेत. सिग्नलिंग आणि कम्युनिकेशन संबंधित कामे देखील सुरु आहेत. ट्रॅक टाकण्यासंबंधीची प्राथमिक कामे देखील सुरु आहेत. महामेट्रोचे डिसेंबर २०२२ मध्ये भुयारी मार्गाचे काम पुर्ण करण्याचे नियोजन केले आहे. याप्रसंगी महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. ब्रिजेश दीक्षित म्हटले आहे की , " भुयारी मार्गाचे काम अत्यंत आवाहनात्मक असुन सर्व पुणेकर नागरिक आणि सर्व शासकीय संस्थांच्या पाठिंब्यामुळेच ९० % टनेलचे कामे वेळेत पुर्ण करू शकलो आहोत. आज पवना टीबीएम मशीन द्वारे बुधवार पेठ येथे ब्रेक थ्रू साधला गेला आणि एका बाजूचा टनेल खोदण्याचे काम पुर्ण झाले आहे. लवकरच संपूर्ण टनेलचे कामे पुर्ण होणार आहेत .